


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३९० वा सोमवार दि १५ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# तुकाराम मुंढेंच्या आधी धडक कारवाया, मग मकोकाचा इशारा; आता मंत्री भुजबळांची एंट्री, चर्चेला उधाण

**वृत्तसंस्था-मुंबई**

सध्या राज्यभर तुकाराम मुंढे नावाचं वादळ घोंघावत आहे. त्यांनी अन्न व औषध प्रशासनाचा कारभार हातात घेतल्यापासून सर्वांचे लक्ष वेधले आहे. सनदी अधिकारी तुकाराम मुंढेंनी यापूर्वीही जिथे काम केलं तिथं त्यांनी त्यांच्या कामाचा धडाका दाखवून दिला आहे. काल त्यांनी पत्रकार परिषद घेत गेल्य काही दिवसांत झालेल्या कारवायांचा लेखाजोखा पत्रकारांच्या माध्यमातून सर्व जनतेसमोर मांडला. त्याचवेळी यापुढे गुटखा, तंबाखूजन्य पदार्थांच्या संदर्भात कठोर कारवाई करणार असल्याचं सांगितलं, विक्रेते, पुरवठादार व संचय करणाऱ्यांसह ग्राहकांवरही मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल अशा स्वरुपाचा मोठा निर्णय काल जाहीर केला. तसा आदेशच त्यांनी काढला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रात छुप्या पद्धतीने गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जनतेच्या आरोग्याशी घातक असे कोणतेही काळे धंदे करणारे लोक आता कायद्याच्या कचाट्यात सापडले की गय केली जाणार नाही, असे त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांनी मुंढेंच्या धडक कारवायांवर भाष्य केलं आहे. त्यांनी त्यांच्या प्रतिक्रियेत म्हटलं की, तुकाराम मुंढे धडक कारवाई करत असतील तर त्यांचं स्वागत आहे. अन्न आहे, दूध, खायचे पदार्थ या सगळ्यात सर्रासपणे भेसळ केली जाते, हे सर्वांना माहिती आहे. मी स्वतः त्यांना फोन करुन सांगितलं की, दुधामध्ये भेसळ होते आहे. कोणतेही केमिकल त्यात टाकले जातात. त्यामुळे किडन्यांचे रोग वाढतात, परिणामी लोकांचे भविष्यंच उद्ध्वस्त होतं. तुम्हाला यावर जास्त जोर द्यावा लागेल, जेवढी कडक कारवाई करणं शक्य असेल तेवढी करा, असं भुजबळांनी सांगितलं.



अन्न धान्य, औषधं यामध्ये काळबेरं करणाऱ्यांवर मकोका लावायचा असेत तर लावावा, कारण तुम्हाला माहिती असताना तुम्ही खोट्या औषधांमधून लोकांचे जीव घेत आहात, म्हणून कारवाई करा, असे मुंढेंना सांगितले असल्याचे भुजबळ म्हणाले आहेत.

---

# साताऱ्यात रंगतदार घडामोडी, महायुतीच्या बैठकीला शिवसेना-राष्ट्रवादीच्या नेत्यांची दांडी

**वृत्तसंस्था सातारा**

सांगली-सातारा विधान परिषद निवडणूक शेवटच्या टप्प्यात अधिकच रंगतदार बनली आहे. भाजपने शनिवारी कराडमध्ये आयोजित केलेल्या महायुतीतील नेत्यांच्या बैठकीकडे शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी पाठ फिरवली. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत भाजप उमेदवाराचा करेक्ट कार्यक्रम करून पालकमंत्री शंभूराज देसाई आणि मदत-पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील हे सातारा जिल्हा परिषदेत झालेल्या राड्याचा बदला घेणार? की शेवटच्या क्षणी पॅचअप होणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सातारा जिल्हा परिषदेतील सत्ता संघर्षाचे पडसाद विधान परिषद निवडणुकीत उमटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्याचे थेट संकेतच पालकमंत्री शंभूराज देसाईंनी दिले आहेत. महायुतीचे घटक पक्ष असूनही आम्हाला प्रचार आणि नियोजनासाठी बोलवत नाहीत. महायुतीतील नेत्यांच्या बैठकीचे आम्हाला निमंत्रण नाही. त्यामुळे आमची अवस्था येऊ नको, तर कुठल्या गाडीत बसू, अशी झाली असल्याची खदखद पर्यटनमंत्री शंभुराज देसाईंनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. सातारा आणि सांगली जिल्ह्यातील फक्त भाजपचे नेतेच महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम यांच्या प्रचारात दिसत आहेत. प्रचारासाठी तुम्हाला बोलवत नाहीत का? या प्रश्नावर शंभूराज देसाई म्हणाले की, निमंत्रण नसताना आम्ही त्यांना कुठल्या गाडीत बसू, असं म्हणायचं का? विधान परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने कोणत्याही बैठकांना शिवसेना व घटक पक्षांना विचारात घेतले जात नसल्याचेही त्यांनी बोलून दाखवले. दरम्यान, शंभूराज देसाईनी दरे गावी जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यांच्यात तासभर चर्चा झाली. त्याचा तपशील मात्र समजू शकला नाही. सांगली-सातारा विधान परिषद मतदारसंघातील निवडणूक आता रंगतदार वळणावर पोहोचली आहे. महायुतीकडून भाजपचे धैर्यशील कदम यांच्या प्रचारासाठी खासदार उदयनराजे भोसले, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार गोरे, आमदार डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, सत्यजितसिंह पाटणकर, अशा मातब्बरांची फौज मैदानात उतरली आहे. महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभयसिंह जगताप हे उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, आमदार जयंत पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार विशाल पाटील, आमदार विश्वजित कदम असे दिग्गज नेते सक्रिय झाले आहेत. दरम्यान, विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी येत्या १८ जूनला मतदान होणार आहे. तर २२ जूनला मतमोजणी होणार आहे. एकूण १७ जागांसाठी ही निवडणूक पार पडणार आहे.

# कर्जमाफी हे वेदना शामक, उपचार नव्हे!




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ङ्कपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६फ जाहीर करताना राज्यातील शेतकऱ्यांना ऐतिहासिक दिलासा दिल्याचा दावा केला आहे. लोककल्याणाला सर्वोच्च स्थान देणाऱ्या अहिल्यादेवींचे नाव या योजनेला दिले असले, तरी योजनेच्या शासन निर्णयातील बारकावे तपासले की एक वेगळेच चित्र समोर येते. ही योजना शेतकऱ्याला कर्जमुक्त करणारी नसून बँकांच्या ताळेबंदातील बुडीत कर्जे सरकारी तिजोरीतून भरून काढणारी, म्हणजेच बँकांची ङ्कबॅलन्सशीट-सफाईफ करणारी योजना आहे, असा थेट आरोप शेतकरी आंदोलक करीत आहेत आणि आकडेवारी पाहिली की या आरोपात तथ्य असल्याचे जाणवते. प्रथम पार्श्वभूमी. खरीप २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यात ७५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे खुद्द केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी मान्य केले आहे. या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी म्हणून नागपूर येथे शेतकरी संघटनांनी मोठे आंदोलन केले. खरिपाची पीककर्जे ३० जून २०२६ नंतर थकीत होणार असल्याने तीच तारीख पात्रतेसाठी धरावी, ही आंदोलकांची प्रमुख मागणी होती. प्रत्यक्षात सरकारने थकबाकीची तारीख ३० सप्टेंबर २०२५ निश्चित केली. योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान उचललेली आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली पीककर्जेच समाविष्ट आहेत. याचा सरळ अर्थ असा की, ज्या आपत्तीमुळे कर्जमाफीची घोषणा करावी लागली, त्याच आपत्तीतील बाधित शेतकरी योजनेच्या बाहेर फेकले गेले आहेत. विशेष म्हणजे, शासन निर्णयातच ङ्कअनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूर शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रात लोटतात,फ अशी कबुली सरकारने दिली आहे. ही ही चूक नाही, हेच धोरण आहे. दुसरा गंभीर मुद्दा दोन लाख रुपयांच्या मर्यादेचा. ही मर्यादा मुद्दल अधिक व्याज धरून आहे. कर्ज थकीत झाले की व्याज सवलत संपते आणि बँका १२.५ ते १४.५ टक्के चक्रवाढ दंडव्याज आकारतात. त्यामुळे कर्ज जितके जुने, तितके दोन लाखांत व्याजाचे प्रमाण अधिक आणि फिटणारे मुद्दल कमी. २०२४-२५ चे कर्ज असेल तर सुमारे १.७८ लाख रुपये मुद्दल फिटते; पण २०१९-२० चे कर्ज असेल तर दोन लाखांपैकी एक लाखाहून अधिक रक्कम केवळ बँकेचे व्याज ठरते आणि शेतकऱ्याच्या वाट्याला येते जेमतेम ९९ हजारांची मुद्दलमाफी. राज्य सरकार बँकेला मात्र पूर्ण दोन लाख अदा करणार आहे. म्हणजे जे व्याज बँकांना एरवी बुडीत म्हणून निर्लेखित करावे लागले असते, ते आता सरकारी तिजोरीतून वसूल होणार. कर्जमाफीच्या नावाखाली बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेची (एनपीए) स्वच्छता, हेच या योजनेचे खरे अर्थकारण आहे. तिसरा मुद्दा उघड पक्षपाताचा. महात्मा फुले कर्जमुक्ती योजना २०१९ चे लाभार्थी पुन्हा थकबाकीत बुडाले असतील, तर त्यांना केवळ ५० हजारांपर्यंतच सवलत मिळणार. वाढता लागवड खर्च, कोसळते भाव आणि सततच्या नैसर्गिक आपत्तींनी ज्यांना पुन्हा कर्जात ढकलले, त्यांना ङ्कएकदा मदत घेतल्याची शिक्षाफ दिली जात आहे. चौथा मुद्दा आणखी बोचरा आहे. दोन लाखांवर थकबाकी असलेल्या शेतकऱ्याला एकरकमी परतफेड सवलत हवी असेल, तर मर्यादेवरील प्रत्येक रुपया त्याने ३१ मार्च २०२७ पूर्वी रोखीने आधी भरावा लागेल. शेतकऱ्याला कसलीही सूट नाही. याच देशात कॉर्पोरेट कंपन्यांना मात्र दिवाळखोरी संहितेखाली (आयबीसी) बँका सरासरी ६७ टक्के, काही प्रकरणांत ७९ ते ९० टक्क्यांपर्यंत कर्जसूट देतात. सोळा लाख कोटींची कॉर्पोरेट कर्जे निर्लेखित करणारी व्यवस्था शेतकऱ्याचा एक रुपयाही सोडायला तयार नाही, हा दुटप्पीपणा या योजनेने ठळकपणे अधोरेखित केला आहे. पाचवा मुद्दा आहे, सहकारी कर्जदारांच्या सापळ्याचा. नैसर्गिक आपत्तीनंतर रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार जिल्हा बँकांना जुने कर्ज पुनर्गठित करून नवे पीककर्ज देणे बंधनकारक असते. प्रत्यक्षात हे ङ्कनूतनीकरणफ केवळ कागदोपत्री होते; रोख व्यवहार नसतोच. पण नूतनीकरणामुळे कर्जाची तारीख नवी होते आणि ते ३० सप्टेंबर २०२५ रोजी ङ्कचालूफ दिसते. परिणामी हा शेतकरी थकबाकीदार नाही म्हणून माफीस अपात्र आणि स्वतःच्या पैशाने फेड केली नाही म्हणून प्रोत्साहनासही अपात्र. नियम पाळणाऱ्या आपत्तीग्रस्ताला दोन्ही टोकांकडून वगळले गेले आहे. शिवाय नियमित परतफेडदारांच्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनासाठी २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये नवे कर्ज घेण्याची सक्ती आहे; कर्जमुक्त राहू इच्छिणारा शेतकरी अपात्र ठरतो. आधार-ॲग्रिस्टॅक नोंदणी अनिवार्य करून मदतनिधीतील रक्कम कायमस्वरूपी ङ्कसहकार स्टॅकफ उभारणीकडे वळवली जात आहे. मागील योजनेत तांत्रिक त्रुटींमुळे तीस हजार शेतकरी लाभाविना राहिले होते; सातबारा-आधार विसंगतीचे कारण पुढे करून लाखोंना वगळण्याची सोय या अटींमध्ये दडलेली आहे. या साऱ्या निकषांची बेरीज केली की लाभार्थींचे आणि वगळलेल्यांचे चित्र स्पष्ट होते. लाभ सर्वप्रथम बँकांना - ताळेबंद स्वच्छ, जमा व्याजाची शासकीय तिजोरीतून भरपाई. शेतकऱ्यांपैकी फक्त २०१९ ते २०२५ या खिडकीतील, दोन लाखांखालील, प्रथमच थकलेल्यांचा अरुंद गट पात्र. बाहेर मात्र मोठा समुदाय - खरीप २०२५-२६ चे आपत्तीग्रस्त, ५० हजारांत गुंडाळलेले फुले योजनेचे लाभार्थी, नूतनीकृत सहकारी कर्जदार, दोन लाखांवरील पूर्ण वसुलीला सामोरे जाणारे, महिना २५ हजारांवर उत्पन्न असलेला एक सदस्य असणारी कुटुंबे आणि ॲग्रिस्टॅकवर नोंद नसलेले शेतकरी. दुष्काळ, अतिवृष्टी किंवा गारपीट पीक उद्ध्वस्त करते आणि पीकविमा योजना भरपाई देण्यात सपशेल अपयशी ठरते. संस्थात्मक पतपुरवठा अपुरा असल्याने लहान व कोरडवाहू शेतकरी खासगी सावकाराकडे ढकलला जातो, जिथे व्याजदर दुप्पट-तिप्पट असतात.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# युद्धाचा भडका! इराणवर सर्वात मोठा हल्ला करू; डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी



■ वॉशिंग्टन/वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची नवी धमकी दिली आहे. इराणची बरीचशी लष्करी ताकद आधीच कमकुवत झाली असल्याचा दावा करत, ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिका रात्री इराणवर मोठा हल्ला करेल.

अमेरिका-इराण युद्ध आता आणखी पेटण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेने इराणवरील हल्ल्यासंदर्भात एक मोठे निवेदन जारी केले आहे. ११ जूनच्या रात्री इराणवर मोठा हल्ला केला जाईल, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी हल्ल्याच्या काही तास आधीच ही धमकी दिली आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडियात हल्ल्याबाबत पोस्ट केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, इराणचे नौदल, हवाई दल, रडार, एंटी एअरक्राफ्ट आणि संरक्षण यंत्रणेसह त्यांची बहुतेक हल्ला करण्याची क्षमता नष्ट करण्यात आली आहे. नजीकच्या भविष्यात आम्ही खार्ग बेट आणि इतर तेल-संबंधित पायाभूत सुविधा ताब्यात घेऊ आणि त्यांच्या तेल आणि गॅस बाजारावर पूर्ण नियंत्रण मिळवू असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. जसे आम्ही व्हेनेझुएलासोबत केले त्यामुळे व्हेनेझुएला आणि अमेरिका या दोघांसाठीही खूप फायदेशीर ठरत आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले.

**अमेरिकेच्या हल्ल्यांना इराणचे प्रत्युत्तर**

पश्चिम आशियामध्ये सातत्याने तणाव वाढत आहे. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणच्या आयआरजीसीने एक निवेदन जारी केले आहे. त्यात कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकेशी संबंधित प्रमुख ठिकाणांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केल्याची घोषणा केली आणि सर्व जहाजांना त्या भागापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. आमच्या प्रत्युत्तरादेखील केलेल्या लष्करी कारवाईत अमेरिकेच्या १८ प्रमुख लष्करी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले, ज्यात कुवेतमधील अली अल-सलेम आणि अहमद अल-जाबेर हवाई तळ आणि बहरीनमधील शेख ईसा हवाई तळाचा समावेश आहे असे आयआरजीसीने एक निवेदन जारी करून सांगितले आहे. अमेरिकेने इराणमध्ये केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली असे इराणने म्हटले.

## पक्ष हिताला प्राधान्य देऊन कार्यकर्त्यांना संधी देणार; अजितदादांप्रमाणे कडक निर्णय घेणार : सुनेत्रा पवार

■ मुंबई/वृत्तसंस्था

27 वर्षापूर्वी स्वाभिमानातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली. अनेक दिग्गज नेत्यांचे कार्यकर्त्यांचे पक्षाच्या जडणघडणीत मोठे योगदान असून पक्षाच्या हिताला प्राधान्य देऊन कार्यकर्त्यांना संधी देणार, असे मत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. पक्षाचा 27 वा वर्धापन दिन साजरा करताना भावनिक वातावरण आहे. आपल्या सर्वांचे नेते अजितदादा आपल्यात नाहीत. त्यांच्याशिवाय साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असल्याचे पवार म्हणाल्या. अजित दादांना विकसीत महाराष्ट्र प्रेरीत होता हे सांगताना सुनेत्रा पवार भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून वेगळ्या परिस्थितीत मी जबाबदारी घेतली आहे. येणाऱ्या सगळ्या गोष्टींची मला जाणीव होती. पदाधिकारी कार्यकर्ता आणि त्यांची निष्ठा माझ्या लक्षात आहे. योग्यवेळी संधी दिली जाईल, असे मत सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. आतापर्यंत जे घडले ते मी समजून घेतले. मी पक्षाच्या हिताला प्राधान्य देईल. कुणाचा हस्तक्षेप असेल तर मी लक्ष देईल. दादा ज्याप्रमाणे कडक निर्णय घ्यायचे तो माझा स्वभाव नसला तरी मी तो निर्णय घेईल, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. अजित पवारांना जो विकसित महाराष्ट्र अपेक्षित होता त्यानुसार आपण काम करत राहू. शिव शाहू फुले आंबेडकर यांची विचारधारा पुढे घेऊन जाणे म्हणजे सर्वांना सोबत घेऊन जाणे असे सुनेत्रा पवार म्हणाल्या.



**प्रत्येक कार्यकर्ता पक्षाचा ऑक्सिजन**

■ ग्रामीण आणि शहरी भागात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रभावी उपायोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहे. आपल्या पक्षाचा एकही कार्यकर्ता मतदानापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी. बूथ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान राखला जाईल. संघटना मजबूत करणे गरजेचे आहे. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा ऑक्सिजन आहे. सर्वांनीच लोकसंग्रह वाढवणे समस्या समजून घेणे त्यासाठी सासत्याने प्रयत्न करणे ही कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे, असे आवाहनही सुनेत्रा पवार यांनी केले.

## एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर; घरभाडे भत्त्यात देखील वाढ

■ मुंबई/वृत्तसंस्था

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

मुंबई सेंट्रल येथील 'वाहतूक भवन' या महामंडळाच्या मुख्यालयात गुरूवारी राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. बैठकीच्या प्रारंभी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे, असे आवाहन केले. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच वेतनवाढीची थकबाकीही आर्थिक परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सोबत एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांची बैठक आयोजित करण्यात येईल अशी ग्वाही दिली.

## 'कॉकरोच जनता पार्टी'चे पुण्यात आंदोलन; आंदोलनात तरुणाचा संताप अनावर




■ पुणे/वृत्तसंस्था

दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनानंतर 'कॉकरोच जनता पार्टी'ने 11 जून रोजी पुण्यात आंदोलन केले. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन पुकारले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू? असा संताप तरूणांनी आंदोलनस्थळी व्यक्त केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आले असून परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे. आंदोलनस्थळी सकाळपासून विद्यार्थी, पालक आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक जण शिक्षण व्यवस्थेतील समस्या आणि आपल्या भावना व्यक्त करताना दिसले. यावेळी आंदोलनासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांनी विविध आशयांचे पोस्टर्स सोबत आणले होते. एका पोस्टरवर लिहिले होते, 'देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र आणि पेपर फोडण्यात धर्मेंद्र'. एकूणच विद्यार्थ्यांकडून चांगलाच प्रतिसाद या आंदोलनाला मिळत असल्याचे दिसून आले आहे. यावेळी बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांना या लोकांमुळे आत्महत्या करावी लागली आहे. तरी सुद्धा हे लोक बिनलाजासारखे खुर्चीला चिटकून बसले आहेत. या सिस्टममुळे या विद्यार्थ्यांना जीव द्यावा लागला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यावर सरकारने कारवाईमध्ये बदली केली आहे, राजीनामा घेऊ शकले नाहीत.

**सत्य आणि अहिंसा माझा मार्ग : सोनम वांगचूक**

■ सोनम वांगचूक म्हणाले, आपल्या देशात असे म्हटले जाते की 'तमसो मा ज्योतिर्गमय'. देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी शिक्षण आणि पर्यावरण हे दोन माझे मुद्दे आहेत. सत्य आणि अहिंसा माझा मार्ग आहे आणि न्याय हे माझे ध्येय आहे. पुढे ते म्हणाले, जो अन्याय परीक्षांमध्ये होत आहे, मला तर शिक्षणात मोठा अंधकार दिसत आहे. परीक्षेतही घोटाळे व्हायला लागले तर विद्यार्थी कुठे जाणार? याचे उत्तर आपण मागितले पाहिजे.

# डीएलएस पद्धतीमुळे भारताच्या पदरी पराभव

## ट्राय सीरिजच्या दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तान-अ चा ४ धावांनी विजय..



■ कोलम्बो/वृत्तसंस्था

ट्राय सिरिजमध्ये भारताचा दूसरा गुरुवारी सामना पार पडला. भारत आणि अफगणिस्तान आमनेसामने आले होते. भारताने प्रथम फलंदाजी करताना अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंहच्या खेळीने भारताने ३५० पर्यन्त मजल मारली होती. मात्र अखेर या सामन्यात पावसामुळे अफगणिस्तानचा विजय झाला. ४ रन्सचे अफगणिस्तानने भारतावर विजय मिळवला. भारताने अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. मात्र अफगणिस्तान फलंदाजी करण्यासाठी आला तेव्हा काही कालावधीनंतर पाऊस सुरु झाला. त्यामुळे ओव्हर्सची संख्या कमी करण्यात आली. या सामन्यात डीएलएस मेथडमुळे अफगणिस्तानने भारतावर ४ रन्सने विजय प्राप्त केला.

### इम्रान - बहिर यांच्यात १०८ धावांची अभेद्य भागीदारी

■ कठीण प्रसंगी कर्णधार इम्रान मीर आणि बहिर शाह यांनी संघाची धुरा सांभाळली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १०८ धावांची अभेद्य भागीदारी केली. इम्रान मीरने ७० चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ७५ धावांची खेळी केली, तर बाहिर शाह ५२ चेंडूत ५१ धावांवर नाबाद राहिला.

अफगणिस्तान कडून इम्रान मीरने सर्वाधिक ८४ रन्सची आक्रमक खेळी केली. तर बाहिर शाहने ५१ रन्सची अर्धशतकी खेळी केली. मात्र पावसामुळे ओव्हर्स कमी करण्यात आल्या आणि अफगणिस्तानचा विजय झाला आहे. भारताकडून अरशद खान आणि अनुकूल रॉयने प्रत्येकी एक एक विकेट घेतली. अफगणिस्तानविरुद्ध वैभव सूर्यवंशीने लहानशी पण आक्रमक खेळी केली. त्याने २२ बॉलमध्ये ४४ रन्सची तुफानी खेळी केली. त्याला प्रभसिमरन सिंहने ८४ रन्सची चांगली साथ दिली. मागील सामन्यात श्रीलंकेविरुद्ध वैभव सूर्यवंशी १४ रन्सवर आउट झाला होता. दुसऱ्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने अत्यंत संयमी आणि महत्वाची खेळी केली. वैभव सूर्यवंशी आउट झाला तेव्हा भारताचा स्कोअर ७४ रन्सवर होता. मागील सामन्यात चांगली खेळी करणाऱ्या ऋतुराज गायकवाडने या सामन्यात अर्धशतकी खेळी केली. त्याने ६६ रन्सची खेळी केली. सुयश शेडगेने ४० रन्सची खेळी केली.

## नेमबाजी कोच जसपाल राणा यांचं ४९व्या वर्षी आकस्मिक निधन; मनू भाकेरच्या यशात होता वाटा

■ पॅरिस/वृत्तसंस्था

भारतीय नेमबाजी विश्वातून अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध नेमबाजी प्रशिक्षक आणि माजी आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचे शुक्रवारी वयाच्या ४९व्या वर्षी निधन झालं. सध्या भारताच्या पिस्तूल नेमबाजांच्या प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळत असलेल्या राणा यांना जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या ISSF World Cup स्पर्धेनंतर भारतात परतताना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याची माहिती समोर आली, त्यानंतर त्यांचं निधन झालं.



भारतीय नेमबाजीला अनेक आंतरराष्ट्रीय यश मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जसपाल राणा यांच्या निधनामुळे क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. भारताच्या पिस्तूल नेमबाजांचे हाय-परफॉर्मन्स प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या राणा यांना जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या ISSF World Cup स्पर्धेनंतर भारतात परतताना अस्वस्थ वाटू लागलं. नवी दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना साकेत येथील मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते.

पण नंतर नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने त्यांच्या निधनाची अधिकृत माहिती दिली आहे. जसपाल राणा यांच्या निधनाने भारतीय नेमबाजी विभागाला मोठा धक्का बसला आहे. खेळाडू आणि प्रशिक्षक या दोन्ही भूमिकांमधून त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ भारतीय नेमबाजीसाठी मोलाचं योगदान दिलं होतं. त्यांच्या जाण्याने भारतीय क्रीडा विश्वाने एक महान नेमबाज आणि प्रेरणादायी मार्गदर्शक गमावला आहे. खेळाडू म्हणून कारकिर्दीनंतर प्रशिक्षक म्हणून जसपाल राणा यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाच्या अध्यायांपैकी एक म्हणजे मनू भाकेर हिच्यासोबतची त्यांची जुळले यशस्वी भागीदारी. मनूच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात राणा यांनी तिच्या तयारीत आणि कौशल्यविकासात मोलाची भूमिका बजावली होती. पुढे मनू भाकेरने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास घडवला. तिने महिला १० मीटर एअर पिस्तूल आणि मिश्र सांघिक १० मीटर एअर पिस्तूल या दोन्ही प्रकारांत कांस्यपदक जिंकत भारतीय क्रीडा इतिहासात आपलं नाव नोंदवलं.

## ऑस्ट्रेलिया संघात निखिल चौधरीची निवड





■ कॅनबेरा/वृत्तसंस्था

भारतात जन्मलेला अष्टपैलू निखिल चौधरीची पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघात निवड झाली आहे. तो बांगलादेशविरुद्धच्या ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेत सहभागी होईल. ३० वर्षीय निखिलला ट्रॅव्हिस हेडच्या जागी संघात समाविष्ट करण्यात आले आहे. हेडला विश्रांती देण्यात आली आहे. पंजाबसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळलेला निखिल २०२० मध्ये कोविड-१९ महामारीदरम्यान ऑस्ट्रेलियात पोहोचला होता. तेथे त्याने ग्रेड क्रिकेट, टास्मानिया आणि होबार्ट हरिकेन्ससाठी उत्कृष्ट कामगिरी करून आपली ओळख निर्माण केली. बांगलादेश दौऱ्यावर त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी आहे. टी-२० मालिका १७ जूनपासून सुरू होईल.

ऑस्ट्रेलियाचे निवडकर्ते टोनी डोडेमाइड म्हणाले की, निखिल बऱ्याच काळापासून राष्ट्रीय संघाच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत होता. निवडकर्ते त्याच्या बिग बॅश आणि देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीने प्रभावित झाले आहेत. निखिलकडे सध्या ऑस्ट्रेलियन नागरिकत्व नाही, परंतु आयसीसीच्या निवासविषयक नियमांची पूर्तता केल्यामुळे तो ऑस्ट्रेलियासाठी खेळण्यास पात्र आहे.

# श्रीलंका दौऱ्यासाठी भारताचा अंडर–१९ संघ जाहीर

## एकदिवसीय व बहुदिवसीय मालिकेसाठी दोन संघाची घोषणा

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या ज्युनियर क्रिकेट समितीने गुरुवारी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय आणि बहुदिवसीय सामन्यांसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघाची घोषणा केली. दोन्ही मालिकांसाठी स्वतंत्र १५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आले आहेत. पहिली मालिका तीन एकदिवसीय सामन्यांची असेल, तर त्यानंतर दोन बहुदिवसीय म्हणजेच मल्टी-डे सामन्यांची मालिका खेळवली जाईल. भारताचे माजी खेळाडू आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा धाकटा मुलगा अन्वय द्रविड याचीही एकदिवसीय मालिकेच्या संघात निवड झाली आहे. भारतीय १९ वर्षांखालील संघाचा श्रीलंका दौरा ४ जुलैपासून सुरू होईल, ज्यासाठी यशवर्धन सिंग चौहानची संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीलंका दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने होईल. पहिला सामना ४ जुलै रोजी, तर दुसरा सामना ६ जुलै रोजी खेळला जाईल. तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना ९ जुलै रोजी खेळला जाईल. हे तिन्ही सामने हंबनटोटा या एकाच ठिकाणी आयोजित केले जातील. यानंतर १३ ते १६ जुलै दरम्यान गॉल येथे पहिला मल्टी- डे सामना होईल. दुसरा बहुदिवसीय सामना २० ते २३ जुलै दरम्यान कोलंबो येथे खेळला जाईल.

**एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघ**

सागर विर्क, लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), यशवर्धन सिंग चौहान (कर्णधार), विनीत व्हीके, अर्जुन राजपूत, कुशाग्र ओझा, रजत बघेल (यष्टीरक्षक), अन्वय द्रविड (यष्टीरक्षक), अनमोलजीत सिंग, वुटकुरी यशवीर गौड, रोहित अनिल यादव, शाविन वी, काव्या परेश पटेल, मोहित उलवा, इशान सूद.

**बहु-दिवसीय सामन्यांसाठी भारतीय अंडर १९ संघ**



सागर विर्क, लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), यशवर्धन सिंग चौहान (कर्णधार), पटेल कुश, मनाल चौहान, कुशाग्र ओझा, मानव कृष्णा (यष्टीरक्षक), आर्यन संदेश सकपाळ (यष्टीरक्षक), हेमचुदेशन जे, बीके किशोर, रोहित, रोहित अनिल यादव, काव्या परेश पटेल, प्रियांशु सिंग, प्रणव राघवेंद्र, चिगुरुपती व्यंकट.

दैनिक जनसंचलन



# मृतदेहाच्या गुप्तांगावर आक्षेपार्ह विनोद करणाऱ्या डॉ. सेजल पवारने मागितली माफी

कॉमेडियन प्रणित मोरेच्या शोमधील '३७० रुपयांची बिर्याणी' या वक्तव्यावरून सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली आहे. त्यातच त्याच्या एका शोमधील दुसऱ्या एका क्लिपमुळे सोशल मीडियावर पुन्हा नवा वाद पेटला. मुंबईतील सेजल पवार नावाच्या डॉक्टर तरुणीने काही महिन्यांपूर्वी प्रणितच्या शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने मृतदेहांच्या प्रायव्हेट पार्ट्सवरून आक्षेपार्ह विधान केलं होतं. यावरून तिच्यावर टीका झाल्यानंतर तिने माफी मागितली आहे.

मुंबईच्या केईएम हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या डॉ. सेजल पवार हिने प्रणित मोरेच्या शोदरम्यान प्रेक्षकांशी संवाद साधताना केलेल्या टिप्पण्यांबद्दल जाहीर माफी मागितली आहे. तिचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक, विद्यार्थी आणि सोशल मीडिया युजर्सनी तीव्र संताप व्यक्त केला होता. अशातच सेजल पवारने इन्स्टाग्रामवर माफी मागितली.




सेजलने म्हणाली, "नुकत्याच व्हायरल झालेल्या व्हिडीओ क्लिपबद्दल मला बोलायचं आहे. तो व्हिडीओ पुन्हा पाहिल्यानंतर, माझ्या बोलण्यामुळे लोक इतके नाराज का झाले आहेत हे मला लक्षात आलंय. हा एक अतिशय संवेदनशील विषय आहे आणि मी ज्या पद्धतीने बोलले होते, तसं बोलायला नको होतं. माझा हेतू कधीही कोणाचा अनादर करण्याचा नव्हता, तरीही माझ्या हेतूपेक्षा त्याचे इतरांवर काय परिणाम झाले हे जास्त महत्त्वाचं आहे."

पुढे सेजल पवार म्हणाली, "मी काय बोलले आणि त्याचा काय अर्थ लावला गेला, याबद्दल मी स्पष्टीकरण द्यायला आलेले नाही. मी जे बोलले, त्याची सर्व जबाबदारी घेते. आता मागे वळून पाहताना मला हे समजतंय की, माझ्या बोलण्याचा वेगळा अर्थ कसा काढला जाऊ शकतो. एक विद्यार्थिनी म्हणून मी या अनुभवातून शिकले. या घटनेने मला माझ्या बोलण्याच्या पद्धतीवर विचार करायला भाग पाडलंय, खासकरून अशा संवेदनशील विषयांवर बोलताना काळजी घ्यायला हवी. त्या क्लिपमुळे ज्या लोकांच्या भावना दुखावल्या, मन दुखावले, त्यांची निराशा मी समजू शकते आणि मी त्यासाठी मनापासून माफी मागते. भविष्यात माझ्याकडून असे पुन्हा कधीही घडणार नाही, याची मी काळजी घेईन," असं सेजल पवार म्हणाली.

मेडिकल कॉलेजच्या 'डिसेक्शन रूम'मधील (पोस्ट मॉर्टेम रूम) तिचा अनुभव सांगताना सेजल म्हणाली की, पोस्टमॉर्टम आणि डिसेक्शन दरम्यान सर्वात आधी पोट आणि कवटी उघडली जाते, आणि शेवटी प्रायव्हेट पार्ट्सची तपासणी केली जाते. यावर प्रणित मोरे गमती म्हणतो, "तू नक्की डॉक्टर आहेस की कसाई? तिथे सगळे लोक गंभीर असतात की विनोदही केले जातात?" यावर उत्तर देताना ती डॉक्टर म्हणते की, तिथे कधीकधी लोक मृतांच्या प्रायव्हेट पार्ट्सच्या आकारावरून विनोद करतात. हे ऐकून प्रणित म्हणतो, "काय? तुम्ही लोक अशा गोष्टी बोलता? बिचाऱ्या काकांनी चांगल्या कामासाठी आपले देहदान केले आणि तुम्ही हे सगळं बोलता." यानंतर तो पुढे गंमतीने म्हणतो, "आता आम्ही आमचे शरीर कसे दान करणार?"

## ५८ व्या वर्षी अक्षय कुमार निवृत्त होणार ?

अ नेहमीच सकारात्मक आणि उत्साही दिसणाऱ्या अक्षय कुमारने आता त्याच्या निवृत्तीबाबत वक्तव्य केल्याने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमादरम्यान त्याने मनात दररोज निवृत्तीचा विचार येत असल्याचे सांगितले आहे.



अक्षय कुमारने आतापर्यंत १५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. ॲक्शन, कॉमेडी, रोमान्स आणि सामाजिक आशय असलेल्या चित्रपटांमध्ये लक्षवेधी भूमिका साकारल्या आहेत. लवकरच त्याचा 'वेलकम' चित्रपटाचा सिक्वेल 'वेलकम टू द जंगल' प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमावेळी अक्षय कुमारने निवृत्तीबाबत वक्तव्य केले आहे. अक्षय कुमार म्हणाला, "अधूनमधून मनामध्ये निवृत्तीचा विचार येतो, पण तो फार वेळ टिकत नाही. रोज पहाटे ४ वाजता उठल्यावर निवृत्ती घ्यावी असा विचार येऊन जातो. पण पुढच्या पाच सेकंदांतच मला आठवतं की शूटिंगला जायचं आहे. सेटवर ३०० लोक वाट पाहत आहेत. मग तो विचार तिथेच सोडून देतो आणि उद्या निवृत्त होऊ, असे स्वतःला समजावतो. पण पुन्हा दुसऱ्या दिवशी पहाटे उठल्यावर हेच विचारांचं चक्र सुरू होतं. गेली ३६ वर्षे हे असंच सुरू आहे."

## अडीच वर्षांनी दीपा परबचं मालिकाविश्वात कमबॅक

मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री दीपा परब तब्बल अडीच वर्षांनंतर पुन्हा एकदा मालिकाविश्वात पुनरागमन करत आहेत. स्टार प्रवाहच्या आगामी 'सुना येती घरा' मालिकेत दीपा 'उमावती' ही अत्यंत महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहेत. कुटुंबातील प्रत्येक नात्याला जपणारी, प्रसंगी स्वतःच्या भावना बाजूला ठेवून इतरांच्या आनंदाला प्राधान्य देणारी आणि घराला एकत्र ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करणारी उमावती ही व्यक्तिरेखा मालिकेचा भावनिक आधारस्तंभ ठरणार आहे.

उमावतीचं आयुष्य म्हणजे संघर्ष, त्याग आणि नात्यांवरील निस्सीम प्रेमाचा सुंदर संगम. श्रीमंतीत वाढलेली असली तरी शिवनाथबरोबर तिने शून्यातून संसार उभा केला. आयुष्यात आलेल्या प्रत्येक चढ-उतारात ती त्याच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहिली आहे. शिवनाथचा स्वभाव तापट असला तरी त्याच्या रागामागचं प्रेम आणि जबाबदारी ती ओळखते. त्यामुळेच त्याच्या प्रत्येक कठोर निर्णयाला समजुतीची आणि प्रेमाची किनार देण्याचं काम ती करते.




मुलांसाठी ती आईपेक्षा जास्त एक मैत्रीण आहे. त्यांच्या चुका समजून घेणारी, त्यांना योग्य मार्ग दाखवणारी आणि वडिलांचा दृष्टीकोन समजावून सांगणारी उमावती घरातील नात्यांना जोडून ठेवते. तिच्या प्रेमळ स्वभावामुळे घरातील तणावाचे प्रसंगही अनेकदा हलके-फुलके होतात. मात्र या हसऱ्या चेहऱ्यामागे एक वेदना दडलेली आहे. आईपासून दूर राहण्याची खंत आणि मोठ्या बहिणीबरोबरचं तुटलेलं नातं पुन्हा जुळण्याची आस तिच्या मनात कायम आहे. माहेरच्या घरावरचं प्रेम ती आजही विसरलेली नाही. दोन्ही कुटुंबांमधील दुरावा मिटून पुन्हा सगळे एकत्र यावेत, हेच तिचं स्वप्न आहे.

# संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर; अशोक पत्की, आनंद भाटे यांच्यासह दिग्गजांचा राष्ट्रीय गौरव

भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार', तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर




कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे. वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे.

अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

वर्ष २०२५ साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत कुस्ती खेळाडूंसाठी विभागीय निवड चाचणी १० जून रोजी

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ‍ਙमिशन लक्ष्यवेधਙ या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्राची स्थापना विभागीय क्रीडा संकुल, अमरावती येथे करण्यात येत आहे. या केंद्रासाठी पात्र खेळाडूंची निवड करण्यासाठी १० जून २०२६ रोजी विभागस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील स्पर्धांमध्ये सहभागाची संधी तसेच वैद्यकीय विमा संरक्षण शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. निवड चाचणीसाठी पात्रता निकष : वयोमर्यादा : २५ वर्षाखालील मुले व मुली (३१ डिसेंबर २०२६ रोजी), महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदकप्राप्त अथवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग असलेले खेळाडू, गत दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यांकन केले जाईल, क्रीडा कौशल्य व शारीरिक तंदुरुस्ती चाचणीत पात्र ठरणे आवश्यक, शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. आवश्यक कागदपत्र: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र व पालकांचे संमतीपत्र. निवड चाचणीचे डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहावे. चाचणी दुपारी १२.०० वाजतापासून सुरु होईल. अधिक माहितीसाठी जितेंद्र भुयार(मो. ८६६८५४६९५१), अनिल इंगळे (मो. ९९७००७११७२) किंवा अनुप वानखडे (मो. ९८८१९८०८२८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासा; राज्य शासनाकडून १४ कोटी ५८ लाखांचा निधी मंजूर....

## बुलढाणा जिल्ह्यासाठी २ कोटी २७ लाखांचा भरीव निधी मंजूर...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये माहे एप्रिल २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याकरिता राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, एकूण १४ कोटी ५८ लाख ९० हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मदत वाटप प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने होणार असून, मदतीचे वाटप थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात होणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. नुकताच निर्गमित झालेल्या अधिकृत शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यात एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे २ हजार २२० बाधित शेतकऱ्यांना (१,३३५ हेक्टर) २ कोटी २७ लाख ३२ हजार रुपये निधी मंजूर केला असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. थेट बँक खात्यात निधी जमा (): निश्चित केलेल्या दरांप्रमाणे सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना मदत निधी थेट त्यांच्या बँक खात्यात डीबीटी () पोर्टलद्वारे वितरित केला जाणार आहे. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना संगणकीय प्रणालीवर सर्व लाभार्थ्यांची माहिती काळजीपूर्वक भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुबार वाटप रोखणार: चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वितरित केलेल्या निधीमध्ये या नव्या प्रस्तावातील मागणीचा समावेश नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एका हंगामात एक वेळच याप्रमाणे मदत दिली जाईल. तसेच कोणत्याही लाभार्थ्याला दुबार मदत मिळणार नाही (द्विरुक्ती होणार नाही), याची संपूर्ण जबाबदारी संबंधित तहसीलदार व जिल्हाधिकारी कार्यालयावर सोपवण्यात आली आहे. बँकांना वसुली करण्यास मनाई: नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळालेला हा मदतीचा निधी बँकांनी कोणत्याही जुन्या कर्ज खात्यात अथवा इतर कोणत्याही कारणास्तव वसुलीसाठी वळत करू नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात, असे शासन निर्णयात नमूद आहे. पारदर्शकता आणि यादी प्रसिद्धी: मदत वाटपाची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, सर्व लाभार्थ्यांची यादी आणि त्यांना मिळालेल्या मदतीचा सविस्तर तपशील जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. शासन निर्णयानुसार पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातील एकूण १६ हजार २६७ बाधित शेतकऱ्यांना या निधीचा लाभ मिळणार असून ८,०९८.९५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४ कोटी ५८ लाख ९० हजार रुपयांचा मदत निधी दिली जात आहे. विभाग व जिल्हावार तपशील खालीलप्रमाणे आहे: पुणे विभागातील सोलापूर जिल्ह्यातील १ हजार २७० बाधित शेतकऱ्यांना (८५६.०५ हेक्टर) १ कोटी ६७ लाख ८९ हजार रुपये, पुणे जिल्हा ८ हजार ५४४ बाधित शेतकरी (३,४९०.०१ हेक्टर) ६ कोटी २३ हजार ८७ हजार रुपये, सातारा जिल्हा २८ बाधित शेतकरी (५.१४ हेक्टर) ९८ हजार रुपये, असे एकूण ९ हजार ८४२ बाधित शेतकऱ्यांना ७ कोटी ९२ लाख ७४ हजार रुपये मदत निधी मंजूर. छत्रपती संभाजीनगर विभागातील धाराशीव जिल्ह्यातील २ हजार २०४ बाधित शेतकऱ्यांना (१,५१०.३२ हेक्टर) २ कोटी ८४ लाख १५ हजार रुपये, नांदेड जिल्हा १४४ बाधित शेतकरी (६४.५० हेक्टर) ९ लाख ५९ हजार रुपये, हिंगोली जिल्हा २९ बाधित शेतकरी(१५.२० हेक्टर) २ लाख ७३ हजार रुपये, असे एकूण २ हजार ३७७ बाधित शेतकऱ्यांना २ कोटी ९६ लाख ४७ हजार रुपये मदत निधी मंजूर. अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यातील २ हजार २२० बाधित शेतकऱ्यांना(१,३३५.०० हेक्टर) २ कोटी २७ लाख ३२ हजार रुपये, वाशीम जिल्हा ८३६ बाधित शेतकरी (२९१.६१ हेक्टर) ४९ लाख ८५ हजार रुपये, यवतमाळ जिल्हा ४४४ बाधित शेतकरी(२४२.११ हेक्टर) ४१ लाख ६० लाख रुपये, अकोला जिल्हा ३०८ बाधित शेतकरी (२०४.८५ हेक्टर) ३४ लाख ८९ लाख रुपये व अमरावती जिल्हा २४० बाधित शेतकरी(८४.९६ हेक्टर) १६ लाख ३ हजार रुपये, असे एकूण ४ हजार ०४८ शेतकऱ्यांना ३ कोटी ६९ लाख ६९ हजार रुपये मदत निधी मंजूर करण्यात आले आहे.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण ३० जूनपासून

**जनसंचलन/बुलढाणा**

मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी निवडणूक विभागामार्फत ङ्कविशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६फ राबविण्यात येत असून, या अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या मोहिमेदरम्यान बीएलओ मतदारांना अंशतः भरलेले गणना पत्र ( ) प्रत्येकी दोन प्रतींमध्ये वितरीत करतील. पात्र मतदारांनी या गणना पत्रातील माहितीची पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या कराव्यात, दोन्ही प्रतींवर स्वाक्षरी करून अद्ययावत छायाचित्र जोडावे आणि ते संबंधित बीएलओकडे जमा करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण २ हजार २८८ बीएलओ नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्या माध्यमातून सुमारे २०.९४ लाख मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. या प्रक्रियेत निवडणूक अधिकाऱ्यांसोबतच राजकीय पक्षांचे सहकार्यही महत्त्वाचे मानले जात आहे. मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नव्याने पात्र ठरलेल्या मतदारांची नोंदणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर राजकीय पक्षांनी बूथ लेव्हल एजंट () नियुक्त करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक व विश्वासार्ह होण्यास मदत होणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरणही करण्यात येणार आहे. मतदार यादी तयार करण्यासाठी १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त दावे व हरकतींवर निर्णय घेऊन ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार आहे. मतदार याद्या अधिक अचूक व त्रुटीरहित करण्याच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सर्व मतदारांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ङ्कप्रवासी राजा दिनफ व दुपारी ३ ते ५ या वेळेत ङ्ककामगार पालक दिनफ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील चिखली आगार येथे दि. १७ जुन, खामगाव आगार येथे दि. २४ जुन, मेहकर आगार येथे दि. १ जुलै , मलकापुर येथे दि. ८ जुलै, जळगाव जामोद येथे दि. १५ जुलै व शेगांव आगार येथे दि. २२ जुलै रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# मग तुकाराम मुंडे आले म्हणे अन् संग्रामपूरात दुकानदारांची धावाधाव सुरू!



**जनसंचलन/ संग्रामपूर**

तालुक्यात गुरुवारी दुपारी अचानक एकच खळबळ उडाली. ङ्ङराज्य उत्पादन शुल्क आयुक्त तुकाराम मुंडे यांचे पथक तालुक्यात दाखल झालेफ्फ, ङ्ङअन्न भेसळ विभागाची धाड पडणारफ्फ अशी वार्ता वाऱ्यासारखी पसरताच संग्रामपूरसह वरवट बकाल, टुनकी, सोनाळा परिसरातील बाजारपेठेत अक्षरशः धावपळ उडाली. काही क्षणांत हॉटेल, खानावळ, पानटपऱ्या, किराणा दुकाने आणि लहान-मोठ्या व्यावसायिकांनी आपापली दुकाने बंद करण्यास सुरुवात केली. नेमकी धाड कुठे पडणार? कोणावर कारवाई होणार? पथक आले आहे की नाही? याची कोणालाही स्पष्ट माहिती नव्हती. मात्र, तुकाराम मुंडे या नावाचा धाक इतका जबरदस्त ठरला की, कोणतीही अधिकृत नोटीस नसताना बाजारपेठ काही काळासाठी बंदसारखी झाली. रस्त्यावर शुकशुकाट, दुकानांना कुलूप आणि व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर धास्ती, असे चित्र दुपारच्या वेळेत पाहायला मिळाले. संग्रामपूर तालुका कडक अधिकाऱ्यांच्या वचकासाठी यापूर्वीही चर्चेत राहिला आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक कृष्णप्रकाश यांच्या धडक कारवायांमुळे गुन्हेगारीला चांगलाच चाप बसला होता. त्यानंतर आता तुकाराम मुंडे यांच्या नावाने पुन्हा एकदा प्रशासनाचा धाक काय असतो, याचा प्रत्यय नागरिकांना आला. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाच्या स्थानिक कार्यालयाकडून गुरुवारी कोणतीही अधिकृत धाड किंवा तपासणी मोहीम राबवण्यात आल्याचे स्पष्ट झालेले नाही. मात्र, केवळ चर्चेच्या आधारे व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केल्याने एक प्रश्न अधिक ठळक झाला आहे

# घरात टीव्ही पाहायला आल्या अन् कपाटातून २.२८ लाख गायब?

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात घरातून २ लाख २८ हजार रुपये गायब झाल्याने खळबळ उडाली आहे. राजेश्वर नगर परिसरातील निर्मिती अपार्टमेंटजवळ राहणाऱ्या एका महिलेच्या घरातील कपाटाच्या ड्रॉवरमधून ही रक्कम चोरी झाल्याची तक्रार बुलढाणा शहर पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौ. वनिता प्रमोद गावंडे या पती आणि मुलांसह राहत असून त्या व त्यांचे पती दोघेही खासगी नोकरी करतात. त्यामुळे दररोज सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेसहा या वेळेत दोघेही घराबाहेर असतात. त्यांच्या घराचे दोन मजले असून खालच्या मजल्यावरील खोल्या भाड्याने दिलेल्या आहेत. फर्निचरच्या कामासाठी २८ मे रोजी नातेवाईकांनी दिलेले १ लाख ५० हजार रुपये आणि आधीपासून घरभाड्याचे जमा असलेले ७८ हजार रुपये, अशी एकूण २ लाख २८ हजारांची रक्कम कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवण्यात आली होती. ड्रॉवरला लॉक लावले असले तरी चावी त्याच ठिकाणी ठेवलेली होती. ६ जून रोजी फर्निचर मिस्त्रीला पैसे देण्यासाठी कपाट उघडले असता रक्कम गायब असल्याचे लक्षात आले. यानंतर घरातील मुलांकडे विचारणा केली असता धक्कादायक माहिती समोर आली. २९ मे रोजी भाड्याने राहणाऱ्या दोन मुली घरात टीव्ही पाहण्यासाठी आल्या होत्या. त्यापैकी एका मुलीने मुलाला घराबाहेर नेले, तर दुसरी किचनमध्ये गेल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी कपाटाचा आवाज आल्याचेही मुलाने सांगितले. विशेष म्हणजे, ङ्ङआम्ही घरात आलो हे मावशीला सांगू नकोफ्फ असे सांगून मुलाला डिजिटल घड्याळ देण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच १ जूनपासून संबंधित मुलींनी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन्ही भाडेकरू बहिणींवर चोरीचा संशय व्यक्त करण्यात आला असून बुलढाणा शहर पोलिसांनी तक्रारीवरून तपास सुरू केला आहे. मात्र घरात ये-जा, कपाटाचा आवाज आणि डिजिटल घड्याळ या सगळ्या गोष्टींमुळे या चोरीभोवतीचा सस्पेन्स अधिकच वाढला आहे.

# साखळी बुद्रुकच्या पाण्यासाठी महिलांचा एल्गार; लेखी आश्वासनानंतर विजया कोळसे यांचे उपोषण मागे!

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील साखळी बुद्रुक गावातील पाणीटंचाईचा प्रश्न अखेर प्रशासनाला हादरवून गेला. स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठ्यासाठी माजी सरपंच तथा विद्यमान सदस्या विजयाताई कोळसे आणि ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण चौथ्या दिवशी लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर आणि मृत्यूंजय गायकवाड यांच्या हस्ते शरबत घेऊन उपोषणाची सांगता करण्यात आली. २८ मे रोजी काढलेल्या मोर्चात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी, तत्काळ टँकर सुरू करावा, एक वर्षाचा पाणीकर माफ करावा, प्रत्येक घरासमोर १००० लिटर पाण्याची व्यवस्था करावी, तसेच जलजीवन मिशनअंतर्गत खर्च झालेल्या सुमारे ५ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीची चौकशी करावी, अशा मागण्यांसाठी हे आंदोलन उभे राहिले होते. रविकांत तुपकर यांच्या मध्यस्थीनंतर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी गिते आणि ग्रामसेविका जवंजाळ यांनी दोन दिवसांत धरण परिसरात दोन बोअरवेल, मोटारपंप आणि अतिरिक्त टँकर सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले. पाण्यासाठी रोज झगडणाऱ्या महिलांनी या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद दिला.




# कांदा बियाणे चोरट्यांच्या टोळीच्या मुसक्या आवळल्या!



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात कांदा बियाणे चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. देऊळगाव राजा हद्दीतील पिंपळनेर येथील जूब्बूजी मायोमास ब्रिकेट इंडस्ट्री कंपनीतून अथर्व सीड्स कंपनीचे तब्बल ६ क्विंटल ६५ किलो कांदा बियाणे चोरीला गेले होते. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते. गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने जालना, छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगर जिल्ह्यात धाडसी कारवाई करत अंकुश खंदारे, विनोद काळे आणि भानूदास उर्फ राहुल गायकवाड या तिघांना मोठ्या शिताफीने अटक केली. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या ताब्यातून ५ क्विंटल ३६ किलो कांदा बियाणे, दोन मोटारसायकली आणि तीन मोबाईल असा एकूण ५ लाख २१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक आशिष रोही यांच्या नेतृत्वाखाली पथकाने केली असून पुढील तपास देऊळगाव राजा पोलीस करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८